सकाळ पिंपरी-चिंचवड
सोमवार, २३ ऑक्टोबर २०२३

# इंडक्शन प्रोग्रॅम उत्साहात

■ **सिद्धांत दोशी** (रसिकलाल धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी, चिंचवड)

श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचालित चिंचवड येथील रसिकलाल धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्रॅम आयोजित केला होता. युनिक अॅकॅडमीचे अध्यक्ष प्रवीण पाटील, मेडिकल ऑपरेशनल मॅनेजर जीविका हेल्थकेअरचे डॉ. ज्योती शिंदे प्रमुख पाहुणे होते. मंडळाचे विस्तार अधिकारी के. बी. खिलारी, प्राचार्य डॉ. सचिन फेगडे उपस्थित होते. धन्वंतरी पूजन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. प्राचार्य डॉ. फेगडे यांनी प्रास्ताविक केले. पाटील यांनी 'कम्युनिकेशन स्किल व सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट' विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ज्याचा विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनामध्ये उपयोग करता येईल. यामध्ये त्यांनी वेगवेगळ्या प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वाचे उदाहरण दिले. तसेच प्रेरणादायी मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. प्रा. संध्या लंके यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. स्वाती ढगे यांनी आभार मानले. प्रा. मंजुश्री गुंजेगावकर यांनी संयोजन केले. दुसऱ्या सत्रात 'सर्वाइकल कॅन्सर व्हॅक्सिनेशन अवेअरनेस' विषयावर डॉ. ज्योती शिंदे यांचे व्याख्यान झाले. त्यांनी सर्वाइकल कॅन्सर, त्याचे करणे व त्यासाठी वापरण्यात येणारे वॅक्सिन यांची माहिती दिली. प्रा. सुचिता खोत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सरिता महामुनी यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश धारिवाल, कार्याध्यक्ष शांतिलाल लुंकड, ऑनररी जनरल सेक्रेटरी अॅड. राजेंद्रकुमार मुथा, कोषाध्यक्ष प्रकाशचंद चोपडा यांचे मार्गदर्शन लाभले.